**प्रेस नोट** दिनांक ४/७/२०१८

# जिवे ठार मारणाचा प्रयत्न करणाऱ्या सराईत गुन्हेगारास गावठी पिस्तुल व जिवंत काडतुसासह शिथापीने पकडण्यास तपास पथक फरासखाना पोलीस स्टेशन यांना यश

काल दिनांक ३/७/२०१८ रोजी फरासखाना पोलीस स्टेशन तपास पथकाचे श्री महेंद्र पाटील पोलीस उप निरीक्षक व कर्मचारी हे सांयकाळी हद्दीत गुन्हयांना प्रतिबंध घालण्याचे अनुषंगाने खाजगी दुचाकीने पेट्रोलींग करीत करीत असतांना पोकॉ हर्षल शिंदे यांना त्याचे बातमीदाराने बातमी दिली की, दिनांक १४/६/२०१८ रोजी उंबऱ्या मारुती मंदीर चौक तपकीर गल्ली बुधवार पेठ पुणे व मंडई येथे सुरज महादेव बनसोडे रा.२२८, मंगळवार पेठ पुणे याचेवर कोयत्याने वार करुन त्यास जीवे ठार मारण्याचा प्रयत्न करणारा रेकॉर्डवरील फरार गुन्हेगार रोहित माने रा.लोहीयानगर पुणे हा पांगुळ आळी गणेश पेठ पुणे येथे आला असुन त्याचे कंबरेला पिस्तुल लावलेले आहे. त्याप्रमाणे तपास पथकातील अधिकारी व कर्मचारी असे पांगुळ आळी गणेश पेठ पुणे येथे गेल्यानंतर त्याची व स्टाफची नजरा नजर होताच तो पळुन जावु लागला, त्याचा पाठलाग करीत असतांना, तो काही अंतरावर पळुन जावुन थांबला व त्याने त्याचे कंबरेस असलेले पिस्तुल काढुन हवेत वर रोखुन **"पुढे येवु नका, पुढे आला तर याद राखा"** अशी रोखुन धमकी देवु लागला. **"त्यास महेंद्र पाटील यांनी पोलीस आहोत, हत्यार खाली घे, आमचे पुढे हजर हो"** असे सांगत असतांना तो ऐकण्याचे परिस्थिती नसल्याने स्टाफ पैकी पोना दिनेश भांदुर्गे व पोहवा योगेश जगताप यांनी त्यास अचानक त्याचे पाठीमागुन जावुन मिठीमारुन त्यास जमीनीवर पाडले त्याचे हातातील गावठी पिस्तुल काढुन घेतले. त्याची अंगझडती घेतली असता त्याचे पॅन्टचे खिशात २ जिवंत काडतुसे मिळुन आले आहे. तसेच आरोपीस पकडत असतांना झालेले झटापटीत पोलीस कर्मचारी दिनेश भांदुर्गे यांना उजवे हातास किरकोळ मार लागला आहे.

आरोपी रोहित दिलीप माने रा.५४, बी पी लोहीयानगर, अजिंक्य मित्र मंडळाशेजारी पुणे रेकॉडवरील गुन्हेगार असुन त्याचेवर विविध पोलीस स्टेशनला शरीराविरुध्द व मालाविरुध्द चे गुन्हे दाखल आहेत. त्याने सदरचे गावठी पिस्तुल हे स्वरक्षणासाठी ठेवले असल्याचे त्याने प्रथमदर्शी तपास दरम्यान सांगितले असुन त्याचेवर फरासखाना पोलीस स्टेशन येथे स्वतंत्र गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदरची कारवाई ही मा. श्री रविंद्र सेनगावकर, अपर पोलीस आयुक्त दक्षिण विभाग पुणे , मा. श्री बसवराज तेली, पोलीस उप आयुक्त परिमंडळ १ व मा. श्री. प्रदिप आफळे ,सहा पोलीस आयुक्त शहर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली फरासखाना पोलीस स्टेशन चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.बाळकृष्ण अंबुरे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) संभाजी शिर्के, तपास पथकाचे प्रभारी पोलीस उप निरीक्षक श्री. महेंद्र पाटील, पोलीस कर्मचारी हर्षल शिंदे, दिनेश भांदुर्गे, बापुसाहेब खुटवड, संदिप पाटील, विनायक शिंदे, योगेश जगताप,संजय गायकवाड, विशाल चौगुले, शंकर संपते, शंकर कुंभार, अमोल सरडे, अमेय रसाळ, विकास बो-हाडे, महावीर वलटे यांचे पथकाने केली.

# <u>प्रेसनोट दि. ०४/०७/२०१८</u>

## खराडी येथील स्पा मसाज सेंटरवर छापा
## ३ सज्ञान मुलींची वेश्या व्यवसायतुन सुटका
## स्पा मालक अटकेत

दि.०३/०७/२०१८ रोजी सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखेकडील पोलीस निरीक्षक श्री.संजय पाटील, यांना पोलीस नाईक तुषार आल्हाट यांचे कडुन माहीती मिळाली की, **"केडीया स्पा हेवन"** एरीसा एव्हेन्यु येथील पहिल्या मजल्यावर, खराडी पुणे येथील मसाज सेंटरमध्ये इसम नामे सोमनाथ बनवारीलाल केडीया हा मसाज पार्लर मध्ये ठेवलेल्या थेरपीस्ट मुलींचेकडुन मसाजचे नावाखाली वेश्या व्यवसाय करुन घेत आहे. अशी खात्रीशीर माहिती मिळाली, त्यावरुन अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष गुन्हे शाखा पुणे शहरचे पोलीस निरीक्षक श्री. संजय पाटील व सामाजिक सुरक्षा विभागाकडील अधिकारी, कर्मचारी तसेच चंदननगर पोलीस स्टेशनकडील अधिकारी कर्मचारी यांनी संयुक्त कारवाई करुन खराडी परिसरातील **"केडीया स्पा हेवन"** एरीसा एव्हेन्यु येथील पहिल्या मजल्यावर खराडी पुणे येथे स्पा मसाज सेंटरमध्ये वेश्या व्यवसाया बाबत खातरजमा करुन तेथे छापा टाकला.

छाप्या दरम्यान नागालॅन्ड राज्यातील १ व महाराष्ट्र राज्यातील २ अशा एकुण ३ सज्ञान मुलींची वेश्याव्यवसायातुन सुटका करुन त्यांना वेश्या व्यवसायास लावणारा सोमनाथ बनवारीलाल केडीया वय ४७ रा. फ्लॅट नंबर ७४२ क्लोव्हर पार्क व्हयुव, लेन नंबर ७, कोरेगाव पार्क पुणे याचे विरुध्द चंदननगर पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर १७३/२०१८, भा.दं.वि. कलम ३७०, ३७० (अ) सह पिटा ॲक्ट कलम ३, ४, ५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी सोमनाथ केडीया यास कारवाईचे वेळी ताब्यात घेण्यात आले आहे.

कारवाईचे वेळी रोख रु. १९,८६०/- रुपये, १ मोबाईल फोन, व इतर कागदपत्रे असा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. तसेच या गुन्ह्यातील पिडीत मुलींना रेस्क्यु फौंडेशन, महमंदवाडी, हडपसर येथे संरक्षणकामी ठेवण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा. श्री. भानुप्रताप बर्गे, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संजय पाटील, सपोनि चंद्रकांत जाधव, सपोनि अनिता खेडकर, तुषार आल्हाट, राजाराम घोगरे, प्रमोद म्हेत्रे, नितीन लोंढे, नितिन तेलंगे, प्रदिप शेलार, सचिन शिंदे, ननिता येळे, सुप्रिया शेवाळे, अनुराधा ठोंबरे, रुपाली चांदगुडे यांनी व चंदननगर पोलीस स्टेशनचे व.पो.नि. श्री. राजेद्र मुळीक व त्यांचे स्टाफसह सयुंक्तीक कारवाई केली आहे.